"बीड जिल्ह्यातील वंजारी समाजाची सामाजिक आणि आर्थिक स्थिती - एक चिकित्सक अभ्यास (इ.स.2015-2025)"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती) या पदवीकरीता सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा संशोधन आराखडा

संशोधक

घुले उमेश भास्कर

(एम.ए. अर्थशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ. शंकर हरिभाऊ कडेकर

सहयोगी प्राध्यापक आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
सामाजिक शास्त्रे संकुल, स्वा.रा.ती.म.वि. नांदेड,
उप-परिसर, लातूर.

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे संकुल, स्वा.रा.ती.म.वि. नांदेड,
उप-परिसर, लातूर.

डिसेंबर – 2024

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखे अंतर्गत, अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती)
या पदवीकरीता सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा संशोधन आराखडा

"बीड जिल्ह्यातील वंजारी समाजाची सामाजिक आणि आर्थिक स्थिती - एक चिकित्सक अभ्यास (इ.स.2015-2025)"

संशोधकाचे नाव	**: घुले उमेश भास्कर**
विषय	**: अर्थशास्त्र**
मो.नं.	**: 9049490810**
प्रवर्ग	**: एन.टी. (ड)**
पत्ता	**: मु.नवाबवाडी, पो.घाटनांदूर, ता.अंबाजोगाई, जि.बीड**
ई-मेल	**: umeshbghule@gmail.com**

मार्गदर्शकाचे नाव	**: डॉ. शंकर हरिभाऊ कडेकर**
मार्गदर्शकाचा हुद्दा	**: सहयोगी प्राध्यापक आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख, सामाजिक शास्त्रे संकुल, स्वा.रा.ती.म.वि. नांदेड, उप-परिसर, लातूर.**
मो.नं.	**: 9405115958**
ई-मेल	**: shkadekar@gmail.com**

"बीड जिल्ह्यातील वंजारी समाजाची सामाजिक आणि आर्थिक स्थिती
- एक चिकित्सक अभ्यास (इ.स.2015-2025)"

प्रस्तावना :

भारतीय समाज व्यवस्थेत जाती व्यवस्थेची निर्मिती केव्हा झाली हे निश्चित सांगता येत नाही. परंतु भारतीय समाज व्यवस्थेत जातिव्यवस्था खोलवर रुजली असून ती एक भारतीय समाज रचनेचे अविभाज्य अंग बनली आहे. या जाती व्यवस्थेचा दीर्घकालीन इतिहास असून जाती उपजाती निर्माण झाल्याचा संदर्भ वेदोत्तर काळात सापडतो. भारतीय समाजात असंख्य जाती असून या प्रत्येक जातीची जीवन पद्धती, राहणीमान, व्यवसाय, धार्मिक प्रथा भिन्न स्वरूपात आहेत. त्यामुळे जाती व्यवस्थेत विविधता दिसून येते.

समाज व्यवस्थेत प्रत्येक जातीने आपले स्वतंत्र अस्तित्व टिकविण्याकरता नियमांची व बंधनांची चौकट निर्माण केलेली आहे. या जातीच्या नियमांचे व बंधनांचे उल्लंघन करण्याचे धाडस कोणीही करत नाही. जातिव्यवस्थेमध्ये अनेक जाती श्रेष्ठ-कनिष्ठ, सवर्ण-दलित, श्रीमंत-गरीब अशा स्वरूपात विभागलेल्या आहेत. तसेच अनेक जातींना जीवन जगण्याकरिता उत्पन्नाची साधने आहेत. तर काही जातींना उत्पन्नाची साधने नाहीत. त्या उपजीविके करिता भटकंती, मजुरी करतात. त्यांचे आर्थिक उत्पन्न अल्प स्वरूपाचे आहे . त्या गरिबीमध्ये जीवन जगत आहेत.

आर्थिक दृष्टीने गरीब असणाऱ्या जाती शैक्षणिक, सामाजिक, व्यवसायिक, राजकीय दृष्टीने मागासलेल्या आहेत. अशा जातींचा भारतीय संविधानात अनुसूचित जाती जमाती म्हणून समावेश करण्यात आला आहे. या जातींचा सर्वांगीण विकास करण्याकरिता त्यांना विशेष सवलती, अर्थसहाय्य देण्यात येते. त्याकरिता आरक्षण या घटकाचा अवलंब करण्यात येत आहे. या आरक्षणामध्ये ही जातीच्या मागासले पणावरून वेगवेगळे प्रवर्ग पाडण्यात आले आहेत जसे की, एस.टी., एस.सी., ओ.बी.सी., एन.टी. इत्यादी या आरक्षणामध्ये ही अ, ब, क, ड गट पाडण्यात आले आहेत. या आरक्षणाचा लाभ अनेक जाती, जमातींना झाला आहे.

भारतात ज्या अनेक मागासलेल्या जाती, जमाती आहेत. या जाती-जमातीमधील एक वंजारी समाज आहे. वंजारी समाज भारत देशामध्ये दीर्घ काळापासून वास्तव्य करीत आहे. वंजारी समाज भारतातील वेगवेगळ्या राज्यात असून महाराष्ट्रामध्येही या समाजाची लोकसंख्या जास्त आहे. महाराष्ट्रामध्ये ही सर्व जिल्ह्यात या समाजाची लोकसंख्या कमी अधिक प्रमाणात आहे. वंजारी समाज पूर्वीपासून भटकंती करणारा समाज असून तो शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक दृष्टीने मागासलेला आहे. या समाजातील बहुतांशी लोक मजुरी, सालगडी, ऊसतोड कामगार या स्वरूपात कामे

करतात. काही लोक पारंपारिक पद्धतीने शेती करतात. या समाजाचा केंद्रामध्ये ओबीसीच्या 27% आरक्षणात समावेश आहे. तर महाराष्ट्रात भटक्या जमातीच्या 11% आरक्षणातील (ड) प्रवर्गात वंजारी समाजाचा समावेश आहे. अशा मागासलेल्या वंजारी समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे उचित ठरते.

संशोधन साहित्याचा आढावा :

प्रस्तुत संशोधन विषयाचे संक्षिप्त ज्ञान प्राप्ती करिता वेगवेगळ्या संशोधक, अभ्यासक, विचारवंत यांनी जातीव्यवस्था, जातीची सामाजिक संरचना, समाज व्यवस्था, संस्कृती, भटक्या जाती, जमाती, वंजारी, बंजारी समाज, वंजारी समाजाचा इतिहास, आरक्षणाचा लढा, त्यांचा राजकीय सहभाग, त्यांचे सामाजिक जीवन, त्यांचा इतिहास यासंबंधी लिखाण केलेले संदर्भ ग्रंथ, क्रमिक पुस्तके, मासिके, वर्तमानपत्र, एम.फील., पीएच.डी. चे प्रबंध इत्यादी साहित्याचा आढावा घेण्यात आला. यामध्ये डॉ.काचोळे यांचे 'भारतीय सामाजिक व्यवस्था', डॉ.काळदाते, 'भारतीय समाजा रचना', डॉ.बाबासाहेब आंबेडकर, 'भारतातील जाती', यशवंत सुमंत, 'महाराष्ट्रातील जाती संस्था विषयक विचार', ॲड.जायभाय बी. आर., 'वंजारी समाजाचा इतिहास', ॲड.ढाकणे देवराव, 'वंजारी समाजाची संस्कृती व इतिहास', आंधळे पि.के. 'वंनजारी बंनजारी', डॉ.वसंत मुंडे, 'महाराष्ट्रातील वंजारी समाज', डॉ.कदम ना.धो., 'महाराष्ट्रातील भटका समाज' इत्यादी साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे.

विषय प्रवेश :

भारत देशाला स्वातंत्र्य मिळून 76 वर्ष पूर्ण झाली आहेत. 1951 पासून स्वतंत्र भारताच्या नियोजनबद्ध विकासाला प्रारंभ झाला. केंद्र व राज्य सरकारने देशात अनेक कल्याणकारी योजना व उपक्रम राबविण्यास सुरुवात केली. त्यामुळे शैक्षणिक, वैज्ञानिक, तांत्रिक, कृषी, औद्योगिक इत्यादी क्षेत्रांमध्ये प्रगती घडून आली. या प्रगतीमुळे सामाजिक व आर्थिक संरचनेत परिवर्तन घडून आले. परंतु शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये वंजारी समाजातील बरेच विकासाच्या लोक मुख्य प्रवाहात आलेले नाहीत. आजही वंजारी समाज मजुरी करणारा, स्थलांतरित मजूर, ऊसतोड कामगार या स्वरूपात ओळखला जात असून तो गरीबीत जीवन जगत आहे. अशा विकास प्रक्रियेपासून दूर राहून गरीबीत जीवन जगणाऱ्या वंजारी समाजाची जीवनपद्धती, शैक्षणिक, सामाजिक, व्यवसायिक, आर्थिक स्थिती इत्यादी घटकांचे अध्ययन करणे उचित ठरते.

संशोधनाचा हेतू :

महाराष्ट्रामध्ये भटक्या जमातीमध्ये वंजारी समाज लोकसंख्येने सर्वाधिक आहे. या समाजाचा शैक्षणिक, सामाजिक, व्यावसायिक, आर्थिक, राजकीय विकास मराठा, मारवाडी, वाणी या जातीप्रमाणे घडून आला नाही. वंजारी समाजात निरक्षरतेचे प्रमाण अधिक असून अनेक लोक भूमीहीन आहेत. ते मजूर, सालगडी, ऊसतोड कामगार, स्थलांतरित मजूर म्हणून कामे करतात. अशा मागासलेल्या वंजारी समाजाचे स्वरूप, त्यांची जीवन पद्धती, व्यवसाय, सामाजिक स्थान, राजकीय सहभाग, आर्थिक स्थिती कशी आहे? त्यांना दैनंदिन जीवन जगत असताना कोणत्या समस्या जाणवतात? त्यांना विकास प्रक्रियेत आणण्यकरिता शासनाकडून कोणत्या सुविधांची आवश्यकता आहे? इत्यादी प्रश्नांची उकल करून त्यावर उपाय सुचविणे हा संशोधनाचा हेतू आहे.

संशोधन विषयातील वेगळेपण :

वंजारी समाजाचे अध्ययन अनेक संशोधकांनी वेगवेगळ्या स्वरूपातून केले आहे. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नेतृत्वात वंजारी समाजाचा सहभाग, ऊसतोड वंजारी समाजाच्या मुलांच्या समस्या, वंजारी समाजाच्या शैक्षणिक समस्या यासंबंधी वंजारी समाजाचे अध्ययन झाले आहे. परंतु वंजारी समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचे अध्ययन यासंबंधी अध्ययन झालेले नाही. म्हणून "बीड जिल्ह्यातील वंजारी समाजाची सामाजिक आणि आर्थिक स्थिती - एक चिकित्सक अभ्यास (इ.स.2015-2025)" या विषयाची संशोधनाकरिता निवड करण्यात आली आहे. या संशोधन विषयाच्या अध्ययनातून वंजारी समाजाचे स्वरूप, त्यांची जीवन पध्दती, त्यांची शैक्षणिक व सामाजिक स्थिती नमूद करण्यात येणार आहे. तसेच वंजारी समाज करीत असलेले व्यवसाय, व्यवसायाची स्थिती, त्यांचे उत्पन्न, यावरून त्यांची आर्थिक स्थिती स्पष्ट करण्यात येणार आहे. हेच सदरील संशोधन विषयाचे वेगळेपण आहे.

अध्ययन क्षेत्र :

महाराष्ट्रामध्ये बीड जिल्हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. बीड जिल्ह्याचे क्षेत्रफळ 10693 चौरस किमी आहे. या जिल्ह्यात बीड, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, गेवराई, माजलगाव, वडवणी, धारूर, परळी, अंबाजोगाई, केज हे 11 तालुके आहेत. सन 2011 च्या जनगणनेनुसार बीड जिल्ह्यात सर्व जाती धर्माच्या व्यक्ती वास्तव्य करीत आहेत. बीड जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 2585049 आहे. यामध्ये पुरुषांची संख्या 1349106 आहे. तर स्त्रियांची संख्या 1235943 आहे. जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्या पैकी ग्रामीण भागात वास्तव्य करणाऱ्या लोकांची संख्या 2070624 आहे. तर शहरी भागात

वास्तव्य करणाऱ्या लोकांची संख्या 514425 आहे. या लोकसंख्यामध्ये वंजारी समाजाची लोकसंख्या 864232 एवढी आहे.

बीड जिल्ह्याचे साक्षरतेचे प्रमाण 77.99% आहे. यामध्ये पुरुष साक्षरतेचे प्रमाण 85.55% आहे. तर स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण 67.80% आहे. बीड जिल्ह्यात एकूण गावांची संख्या 1357 आहे. तर ग्रामपंचायतची संख्या 1019 आहे. या ग्रामपंचायती पैकी 832 ग्रामपंचायती स्वतंत्र आहेत. तर 187 गट ग्रामपंचायत आहेत जिल्ह्यात 11 पंचायत समिती व सात कृषी उत्पन्न बाजार समिती आहेत. बीड जिल्ह्यातील 67% शेती हलक्या प्रतीची तर 33% शेती काळी कसदार आहे. येथील 82% शेती कोरडवाहू असून ती पावसावर आधारित आहे. या शेतीतून मोठ्या प्रमाणात खरीप पिके घेतली जातात. तसेच या जिल्ह्यात औद्योगिक वसाहतीचा विकास झाला नसल्यामुळे येथे मजुरांना रोजगाराची उपलब्धता नाही. त्यामुळे येथील अनेक लोक पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर इत्यादी ठिकाणी स्थलांतरित मजूर म्हणून जातात. तर काही मजूर सालगडी म्हणून कामे करतात. तर अनेक लोक ऊसतोड मजूर म्हणून काम करतात. मजुरांमध्ये वंजारी समाजाच्या लोकांचे प्रमाण अधिक आहे. म्हणून सदरील संशोधन विषयाच्या अध्ययनाकरिता अध्ययन क्षेत्र म्हणून बीड जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे.

समस्या सूत्रण :

महाराष्ट्रात वंजारी समाजाची लोकसंख्या 70 ते 74 लाखापर्यंत आहे. ती सर्वच जिल्ह्यात कमी अधिक प्रमाणात वास्तव्य करीत आहे. तरीही बीड, नाशिक, बुलढाणा, वाशिम, अहमदनगर, जालना, परभणी, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, अकोला या जिल्ह्यामध्ये जास्त आहे. केंद्रीय स्तरावर वंजारी समाजाचा ओबीसी प्रवर्गातील 27 टक्के आरक्षणात समावेश करण्यात आला आहे. तर महाराष्ट्रात भटक्या विमुक्त जमातीच्या 11 टक्के आरक्षणातील 'ड' प्रवर्गातून 02 टक्के आरक्षणात समावेश करण्यात आला आहे. यावरून स्पष्ट होते की, वंजारी समाज शैक्षणिक, सामाजिक, व्यावसायिक, आर्थिक, राजकीय दृष्टीने मागासलेला आहे. या समाजातील 02 टक्के व्यक्ती शैक्षणिक, सामाजिक, व्यवसायिक, आर्थिक, राजकीय दृष्टीने विकसित झालेला दिसून येत असल्या तरी बहुतांशी व्यक्ती निरक्षर असून त्या शेती, पशुपालन, मजुरी करून उपजीविका करीत आहेत.

वंजारी समाजाकडे आर्थिक उत्पन्नाची साधने नसल्यामुळे ते गरिबीत जीवन जगत आहेत. आशा मागास व गरिबीत जीवन जगणाऱ्या वंजारी समाजाच्या व्यक्तींची शैक्षणिक स्थिती काय आहे? त्यांचे उपजीविकेचे व्यवसाय कोणते आहेत? त्यांचे उत्पन्न किती आहे? त्यांचा सामाजिक दर्जा कोणत्या स्वरूपाचा आहे? इत्यादी प्रश्नांची उकल करण्याकरिता "बीड जिल्ह्यातील वंजारी समाजाची सामाजिक आणि आर्थिक स्थिती - एक चिकित्सक अभ्यास (इ.स.2015-2025)" या विषयाची संशोधनाकरिता निवड करण्यात आली आहे.

संशोधन विषयाच्या कालखंडाची निवड :

संशोधनामध्ये अध्ययनाचे घटक, कालावधी ठरविणे आवश्यक असते. संशोधनाची दिशा निश्चित नसेल तर संशोधकाचा कोणत्या घटकाचे व कोणत्या कालावधीतील अध्ययन करावयाचे यासंबंधी गोंधळ निर्माण होतो. तसेच अनावश्यक तथ्य संकलित होतात. ते संशोधनाकरिता उपयुक्त ठरत नाहीत. असे होऊ नये याकरिता "बीड जिल्ह्यातील वंजारी समाजाची सामाजिक आणि आर्थिक स्थिती - एक चिकित्सक अभ्यास (इ.स.2015-2025)" या संशोधन विषयाच्या अध्ययनाकरिता इ.स. सन 2015 ते 2025 हा दहा वर्षाचा कालखंड निवडण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

बीड जिल्ह्यातील वंजारी समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन करण्याकरिता खालील प्रमाणे संशोधनाच्या उद्दिष्टांची मांडणी करण्यात आली आहे.

1) वंजारी समाजाचा ऐतिहासिक आढावा घेणे.
2) वंजारी समाजाच्या सांस्कृतिक व शैक्षणिक स्थितीचा आढावा घेणे.
3) वंजारी समाजाच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
4) वंजारी समाजाच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेणे.
5) वंजारी समाज करीत असलेल्या व्यवसायाचा आढावा घेणे.
6) वंजारी समाजाच्या दारिद्र्याची कारणे शोधणे व त्यावर उपाय सुचवणे.
7) शासकीय योजनांचा वंजारी समाजावर झालेल्या परिणामाचे अध्ययन करणे.

संशोधनाची गृहीतके :

"बीड जिल्ह्यातील वंजारी समाजाची सामाजिक आणि आर्थिक स्थिती - एक चिकित्सक अभ्यास (इ.स.2015-2025)" या संशोधन विषयाच्या अभ्यासाकरिता खालील प्रमाणे गृहीतकांची मांडणी करण्यात आली.

1) बीड जिल्ह्यातील बहुतांश वंजारी समाज भटक्या विमुक्त जातीच्या स्वरूपात वास्तव्य करीत असून डोंगराळ भागात वसलेला आहे.
2) बीड जिल्ह्यातील वंजारी समाज सांस्कृतिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला आहे.
3) बीड जिल्ह्यातील वंजारी समाज सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागासलेला आहे.
4) बीड जिल्ह्यातील वंजारी समाजाचा प्रमुख व्यवसाय शेती आहे.

संशोधनाची कार्यपद्धती :

सदरील संशोधनाकरिता आवश्यक तेथे भौतिक साधनसामुग्रीचा अवलंब करण्यात येईल. त्याचबरोबर तथ्य संकलनाकरिता प्राथमिक व द्वितीय स्रोतांचा अवलंब करण्यात येईल. संकलित तथ्यावर प्रक्रीयाकरून वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीने संशोधन विषयाची मांडणी करण्यात येईल.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनाकरिता वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. यामध्ये तथ्यांची क्रमबद्ध मांडणी करून समोर येणाऱ्या निष्कर्षांची शब्दांच्या माध्यमातून वर्णनात्मक स्वरूपात मांडणी करण्यात येईल.

नमुना निवड :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्ययनाकरिता बीड जिल्ह्यातील बीड, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, गेवराई, माजलगाव, वडवणी, धारूर, परळी, अंबाजोगाई, केज या 11 तालुक्यांचे अध्ययन क्षेत्र म्हणून निवड करण्यात येईल. या प्रतेक तालुक्यातून मागास, मध्यम व विकसित अशा 03 गावांची निवड करण्यात येईल. अध्ययनाकरिता एकूण 33 गावांची निवड करण्यात येईल. तर अध्ययनाकरिता वंजारी समाजाच्या 550 स्त्री-पुरुषांची नमुना म्हणून निवड करण्यात येईल. ही नमुना निवड अ प्रमाणबद्ध सहेतुक नमुना निवड पद्धतीने करण्यात येईल. या नमुना निवडीमध्ये सर्वच स्तरातील घटकांना प्रतिनिधित्व देण्याकरिता श्रीमंत, गरीब, साक्षर निरक्षर स्त्री-पुरुष यांची निवड करण्यात येईल.

संशोधन आराखडा :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्ययन कार्यासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक आराखड्याचा अवलंब करण्यात येईल. संशोधनात वास्तविक आणि विश्वासनीय तथ्यांची मांडणी करणे हा वैज्ञानिक वर्णनात्मक आराखड्याचा आधार आहे. संशोधन आराखड्यामुळे संशोधनाला योग्य दिशा मिळते. त्याचबरोबर वेळ, पैसा आणि श्रम यांची बचत होते. तसेच संशोधनाच्या उद्दिष्टाला अनुसरून योग्य तथ्य संकलन करणे शक्य होते.

तथ्य संकलन :

सदरील संशोधन विषयाच्या अध्ययनाकरिता तथ्य संकलनासाठी प्रामुख्याने प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांचा अवलंब खालील प्रमाणे करण्यात येईल.

अ) प्राथमिक स्त्रोत :

प्रस्तुत संशोधन विषयाचे अध्ययन क्षेत्र म्हणून बीड जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील 11 तालुक्यामधून वंजारी समाजाच्या 550 स्त्री-पुरुषांची नमुना निवड केली जाणार आहे. नमुना निवड करण्यात आलेल्या स्त्री-पुरुषाकडून तथ्य संकलित करण्याकरिता प्रामुख्याने मुलाखत अनुसूची या प्राथमिक स्त्रोताचा अवलंब केला जाईल.

सदरील संशोधन विषयाच्या तथ्यसंकलनाकरिता प्राथमिक स्रोताबरोबरच द्वितीय स्रोतांचा अवलंब पुढील प्रमाणे करण्यात येईल.

ब) द्वितीय स्रोत :

संशोधनात अध्ययन विषयाच्या संबंधित सूक्ष्म स्वरूपाची माहिती मिळविण्याकरिता द्वितीय स्रोतांचा अवलंब केला जातो. द्वितीय स्त्रोताच्या माहितीसाठी अध्ययन विषयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट होण्यास मदत होते. सदरील संशोधन विषयाच्या अध्ययनाकरिता द्वितीय स्त्रोतामधील प्रकाशित आणि अप्रकाशित साहित्याचा उपयोग करण्यात येईल.

प्रकाशित साहित्यात विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे, वार्षिक अंक, शासकीय व निमशासकीय संस्था, संघटना, मंडळे यांचे अहवाल इत्यादीचा अवलंब करण्यात येईल. तसेच अप्रकाशित साहित्यात पी.एचडी., एम.फिल.चे प्रबंध, शासकीय गॅजेटार, स्वयंसेवी संस्थाचे अहवाल व विविध संकेत स्थळे इत्यादीचा अवलंब करण्यात येईल.

तथ्य प्रक्रियन :

प्रस्तुत संशोधनाकरिता संकलित करण्यात आलेल्या तथ्यांना संशोधनाच्या दृष्टीने उपयोगी बनविण्याकरिता पुढील प्रमाणे तथ्यांवर प्रक्रिया करण्यात येईल.

अ) तथ्यांचे वर्गीकरण :

संकलित तथ्यांची अंकन पद्धतीच्या माध्यमातून क्रमबद्ध पद्धतीने मांडणी करण्यात येईल. यामध्ये उत्तरदात्यांची वैयक्तिक, कौटुंबिक, शैक्षणिक, सामाजिक, व्यावसायिक, आर्थिक इत्यादी घटकातून वर्गीकरण करण्यात येईल.

ब) तथ्यांची क्रमबद्ध मांडणी :

संकलित तथ्यांना शास्त्रीय अर्थ प्राप्त करण्याकरिता आणि संशोधनाची सुरळीत पद्धतीने रचना करण्याकरिता रखाना अंकन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

तथ्य विश्लेषण :

संकलित तथ्यांचे व्यवस्थितीकरण संघटन आणि त्यांच्यातील परस्पर अंतर सबंध स्पष्ट केल्याशिवाय संकलित तथ्यांचा अर्थ बोध होत नाही. त्यामध्ये संशोधनात सारणीबद्ध झालेल्या तथ्यांतील अंगभूत असणाऱ्या तथ्यांचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी प्राथमिक सांख्यिकीय तंत्रांचा वापर करून तथ्यांचे विश्लेषण करण्यात येईल. नंतर तथ्यांचे निर्वचन करून समोर आलेल्या निष्कर्षांची मांडणी करण्यात येईल.

संशोधनाचे महत्त्व :

1) सदरील अध्ययनामुळे बीड जिल्ह्यातील वंजारी समाजाची ऐतिहासिक माहिती आधुनिक तरुण पिढीला मिळेल.

2) सदरील अध्ययनामुळे वंजारी समाजाला आपल्या वास्तव सामाजिक व आर्थिक स्तराची जाणीव होईल.

3) वंजारी समाजाची शैक्षणिक प्रगती प्रशासकीय नोकऱ्यामधील सहभाग आणि राजकीय स्थान यांचे स्वरूप स्पष्ट होईल.

4) बीड जिल्ह्यातील वंजारी समाजाच्या व्यवसायाचे स्वरूप स्पष्ट होईल.

5) वंजारी समाजाचा सामाजिक दर्जा आणि सांस्कृतिक स्थिती सुधारण्यासाठी उपाय योजता येतील.

6) वंजारी समाजाचा आर्थिक दर्जा उंचावण्याकरिता व्यावसायिक साधने आणि शासकीय योजना याबाबत सरकारला धोरण आखता येईल.

संशोधनाच्या मर्यादा :

प्रस्तुत संशोधनाच्या मर्यादा पुढीलप्रमाणे आहेत.

1) सदरील संशोधन हे बीड जिल्ह्यातील वंजारी समाजापुरतेच मर्यादित असेल.

2) हे अध्ययन क्षेत्र म्हणून निवडण्यात आलेल्या बीड जिल्ह्यापुरतेच गृहीत धरण्यात येईल.

3) या संशोधनाअंती निघालेले निष्कर्ष इतर जिल्ह्यातील वंजारी समाजाला जशास तसे लागू पडतील असे नाही. तसेच स्थळ, काळ व परिस्थितीनुसार निष्कर्षामध्ये बदल होऊ शकतो.

प्रकरणीकरण :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्ययनाचे विभागणी खालील प्रमाणे सहा प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

सदरील प्रकरणांमध्ये भारतातील जातीव्यवस्था वर्णव्यवस्था, भटक्या विमुक्त जमाती त्यांची जीवनपद्धती, वंजारी समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि सामाजिक व सांस्कृतिक जीवन इत्यादी घटकांचे अध्ययन करून संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण दुसरे - संशोधन पद्धती

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संशोधन विषयाच्या अध्ययनाकरिता वापरण्यात येणाऱ्या संशोधन पद्धतीचे सविस्तर मांडणी करण्यात येईल. यामध्ये समस्या सूत्रन, संशोधनाची उद्दिष्टे, गृहीतके, अध्ययन क्षेत्राचा परिचय, नमुना निवड, संशोधन पद्धती, संशोधन आराखडा, तथ्य संकलन पद्धती, संशोधन विषयाची व्याप्ती, मर्यादा, संशोधनाचे महत्त्व इत्यादी घटकांची संक्षिप्त स्वरूपात अध्ययन करण्यात येईल.

प्रकरण तिसरे - बीड जिल्ह्यातील वंजारी समाजाची कौटुंबिक, धार्मिक आणि शैक्षणिक स्थिती

सदरील प्रकरणांमध्ये वंजारी समाजातील कुटुंबाचे प्रकार, कुटुंबातील अधिकार, कुटुंबातील व्यक्तीस्वातंत्र कुटुंबातील स्त्री-पुरुषांचा दर्जा, मुला-मुली विषय दृष्टिकोन इत्यादी घटकांचे संक्षिप्त अध्ययन करण्यात येईल. तसेच त्यांचा धार्मिक दृष्टिकोन, धार्मिक श्रद्धा, सण, उत्सव, प्रथा, परंपरा यांचे अध्ययन करण्यात येईल. त्याचबरोबर वंजारी समाजाचा शिक्षणासंबंधीचा दृष्टिकोन, शिक्षण घेताना येणाऱ्या समस्या, शैक्षणिक सुविधा, शासकीय शैक्षणिक सुविधांचा लाभ इत्यादी घटकांचे अध्ययन करण्यात येईल.

प्रकरण चौथे - बीड जिल्ह्यातील वंजारी समाजाची सामाजिक व राजकीय स्थिती

प्रस्तुत प्रकरणांमध्ये वंजारी समाजाचा सामाजिक सहभाग, सामाजिक स्वातंत्र्य, सामाजिक कार्यक्रमाच्या निर्णय प्रक्रियेत सहभाग, सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन यामधील सहभाग, सामाजिक जीवन जगताना येणाऱ्या समस्या, वंजारी समाजाचे सामाजिक संघटन इत्यादीचे अध्ययन करण्यात येईल. तसेच वंजारी समाजाचा राजकीय सहभाग, राजकीय नेतृत्व, राजकीय संघटन इत्यादी घटकांचे अध्ययन करण्यात येईल.

प्रकरण पाचवे - बीड जिल्ह्यातील वंजारी समाजाची आर्थिक स्थिती

सदरील प्रकरणांमध्ये वंजारी समाज करीत असलेले व्यवसाय, उत्पन्नाची साधने, त्यांनी व्यवसायातून मिळत असलेले आर्थिक उत्पन्न, व्यवसाय करताना येणाऱ्या समस्या, शासनाच्या आर्थिक योजनांच्या लाभाचा आर्थिक उत्पन्नावर झालेला परिणाम आणि त्यांची एकंदरीत आर्थिक स्थिती इत्यादी घटकांचे अध्ययन करण्यात येईल.

प्रकरण सहावे - निष्कर्ष व शिफारसी

प्रस्तुत प्रकरणांमध्ये "बीड जिल्ह्यातील वंजारी समाजाची सामाजिक आणि आर्थिक स्थिती - एक चिकित्सक अभ्यास (इ.स.2015-2025)" या संशोधन विषयाला अनुसरून संकलित करण्यात आलेल्या तथ्यांच्या आधारे संशोधनाची उद्दिष्टे आणि गृहीतकांची सिद्धता मांडण्यात येईल. संकलित तथ्यांच्या वर्गीकरणातून समोर आलेल्या निष्कर्षाची संक्षिप्त स्वरूपात मांडणी करण्यात येईल. निष्कर्षाला अनुसरून वंजारी समाजाच्या सामाजिक व आर्थिक विकासाकरिता शिफारसी करण्यात येतील. त्याचबरोबर सदरील संशोधन विषयाला अनुसरून पुढील संशोधनाच्या दिशा सुचविण्यात येतील.

संदर्भ सूची :

1) आंबेडकर बी.आर, "भारतातील जाती" आनंद प्रकाशन, औरंगाबाद, 2007.

2) आंधळे पि.के., "वंजारी बंजारी", खंड – 1, सुराकीर्ती प्रकाशन, नाशिक, 1999.

3) काचोळे दा.धो., "समाजशास्त्रीय संशोधन पद्धती", कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, 2005.

4) काचोळे दा.धो., "भारतीय सामाजिक समस्या", कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, 1996.

5) काळदाते सुधा, "भारतीय समाजरचना", मराठवाडा विद्यापीठ प्रकाशन, औरंगाबाद, 1991.

6) कुलकर्णी एम.जी., "भारतीय समाज व्यवस्था", परिमाल प्रकाशन, औरंगाबाद, 1987.

7) गोल्हार के. एम. "वंजारी समाजाची आरक्षण चळवळ", वार्षिक गोपिका दिवाळी अंक, बीड, 2003.

8) घोटाळे रा.ना., "समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पद्धती", श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, 2000.

9) जायभाय बी.आर., "वंजारी समाजाचा इतिहास" दै. गावकरी, संत भगवान बाबा अभिवादन विशेषांक, दि.09/10/2008

10) ढाकणे देवराव, "वंजारी समाजाची संस्कृती व इतिहास", वार्षिक गोपिका दिवाळी अंक, बीड, 1947

11) तांबे श्रुती, "भटक्या विमुक्तांच्या आकांक्षा प्रतिबिंब - एक वृत्तांत" समाज प्रबोधन पत्रिका, मेहरा गावस्कर पब्लिकेशन्स, बेळगाव, मार्च – 2007.

12) नागगोंडे गुरुनाथ, "सामाजिक संशोधन पद्धती", फडके प्रकाशन, नागपूर, 1999.

13) पिंगळे भीमराव, "वनवासी व उपेक्षित जग", अभिनव जीवन प्रकाशन, बीड, 1990.

14) बीड जिल्हा सामाजिक आणि आर्थिक समालोचन, - 2013.

15) मुंडे वसंत, "महाराष्ट्रातील वंजारी समाज", सविता प्रकाशन, उस्मानाबाद, 1998.

16) वाढे रामनाथ, (संपा. साहेबराव खरात), "भटक्या विमुक्तांचे लोकसाहित्य" उगवतीचे रंग, त्रैमासिक, जून – 2006.

17) वाघ राजेंद्र, "वंजारी आज, काल आणि उद्या", वार्षिक गोपिका दिवाळी अंक, बीड, 1994.

18) सुमंत यशवंत, "महाराष्ट्रातील जाती संस्था विषयक विचार", प्रतिमा प्रकाशन पुणे, 1998.

19) https//beed.gov.in

20) https//www indiastatdistricts.com.

संशोधक

घुले उमेश भास्कर
मु.नवाब वाडी, पो.घाटनांदुर,
ता. आंबेजोगाई, जि.बीड

मार्गदर्शक

डॉ. शंकर हरिभाऊ कडेकर
सहयोगी प्राध्यापक आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
सामाजिक शास्त्रे संकुल, स्वा.रा.ती.म.वि. नांदेड,
उप-परिसर, लातूर.